# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दिनांक ०५/०७/२००३ रोजीची तहकुब स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०७/०७/२००३ रोजी सभा सुचना क्र. १० दि. ०१/०७/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ७) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ८) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ९) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| १०) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १४) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| १५) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १६) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करुन प्र. सचिवांनी आजच्या सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(मा. सभापतींच्या मंजुरीने प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८९ चे वाचन केले)

**मा. सभापती :-**

सदरचा विषय विषयपत्रिकेवरील विषय संपल्यावर घेण्यांत येईल.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९० चे वाचन केले.)

**शिवप्रकाश भुदेका :-**

पेमेन्ट कितना है। और मुदत बढती रहेगी क्या?

**मा. सभापती :-**

काम समाधानकारक रहेगा तो मुदत बढती रहेगी।

**शरद पाटील :-**

आपण ठेकेदारांना मुदतवाढ देतोय आणि त्यांना मुदतवाढ देत असतांना आपण ह्यांनादेखील बोलावतोय.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपला सॉफ्टवेअर आहे का?

**धनराज अग्रवाल :-**

आमचे दुमत नाही. जो विशेष माहिती तंत्रज्ञान अधिकारी मागवायचे आहे त्याचे आपल्याला योग्य त-हेने नियोजन करायचे आहे. आपल्याकडे जो संगणकाचा प्रस्ताव आला आहे परंतु आपल्याकडे जास्त प्रमाणात संगणक कुठे आहेत?

**लिओ कोलासो :-**

मला माहिती आहे की, कल्याण महानगरपालिकेत संगणकीकरण करण्यांत आले आहे. कल्याण महानगरपालिकेत संगणकीकरणाचा प्रस्ताव आणला आहे. त्या महानगरपालिकेत स्वतंत्र असा पॅकेज तयार करण्यांत आला व असा आला तरी यशस्वी होईल असे सांगता येत नाही. आता प्रश्न धनराज अग्रवालने सांगितले संगणक नाही ते कधीही येऊ शकते. पहिल्यांदा प्रोग्राम टू अवर सॅटीस्फेक्शन असे प्रोग्राम आहे का? हे जे शंभर प्रोग्रॅम काय आहे हे आधी आम्हांला समजायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

कोई भी सॉफ्टवेअर एक्सपर्ट है वो हम जैसा चाहेंगे वैसा प्रोग्राम बना सकता है। ठिक है उन्हे महानगरपालिकाका एक्सपरीएन्स है। मगर हर महानगरपालिकामे संगणक पर काम करनेका डिफरन्स भी हो सकता है। आपका संगणकीकरण का प्रस्ताव है तो हर एक कर्मचारी को संगणक सिखना जरुरी है, और हर एकने सिख लिया है। पर हमारे यहाँ कितने संगणक है। और इस व्यक्ती को यहाँपर लाने के बाद हमें उसका पेमेन्ट तो देना ही होगा। उस एक्सपर्ट को यहाँपर लाने के बाद आप संगणक लानेवाले है क्या? पहले अपने यहाँ संगणक आने दो ना।

**मा. सभापती :-**

जे अधिकारी आणि कर्मचारी आहेत त्यांना एम.एस.सी.आय.टी.ची परिक्षा उत्तीर्ण होणे जरुरीचे आहे. आपण संगणकीकृत करणार तर प्रत्येक ठिकाणी एक एक संगणक हे जरुरी होणार आहे आणि त्याची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच आपला जो कर्मचारी वर्ग आहे त्याला संगणक कसे ऑपरेट करायचे त्याची माहिती असणे आवश्यक आहे. कोणतेही काम करतांना सॉफ्टवेअर करणे गरजेचे आहे आणि जे प्रोग्राम बनवायचे आहे त्याची माहिती अंत्यंत आवश्यक आहे आणि अशी माहिती असणारा एक्सपर्ट आपल्या भाईंदर शहरामध्ये आहे व तो सर्व महानगरपालिकेमध्ये काम करण्याचा त्याला अनुभव आहे. ती व्यक्ती आपल्या भाईंदर शहरामध्ये राहते आणि अशा त्या व्यक्तीला आम्ही सांगितले जर तुमचे मार्गदर्शन आम्हांला मिळाले तर अतिशय चांगले होईल. आपण त्यांना आधी पाच महिन्याकरिता घेणार आहोत व नंतर त्यांना मुदत वाढवून द्यायची की नाही त्याकरिता देखील विषय पुन्हा आपल्याकडेच येणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आप यह विषय चर्चेमे लेकर आए यह बरोबर है। वह कुशल है, तंत्रज्ञ है और उनके मार्गदर्शन की जरुरत है यह भी मै बोलता हूँ। पर अपने यहा महापौर मॅडम, उपमहापौर साहब, कमिशनर, लेखा विभाग कुल मिलाकर चार-पाँच कंम्प्युटर है। आपण सिर्फ उनके लिए उस एस्क्पर्ट को बुलाएंगे क्या? अपने यहा कम्प्युटर आने के लिए वक्त है। तो उसे अभी बुलाने का और फिर बाद में मुदतवाढ देने की बात आएगी।

**चंद्रकांत वैती :-**

मा. उपआयुक्त सो., मा. सभापती सो. आपल्या स्थायी समितीसमोर जो प्रस्ताव आला आहे त्याबाबत धनराज अग्रवालजींनी येथे जी भुमिका मांडली आहे ती अतिशय चांगल्या पद्धतीने मांडली आहे व मी त्यांचे समर्थन करतो. आपल्याला संपूर्णपणे इलेक्टॉनिक्स मिडीया करायचे आहे. आपण आजपर्यंत पाण्याचे बिल, घरपट्टीसाठी संगणक व संगणक चालक भाड्याने घेतले. शासनाने नियम करुन दिले होते. एम.एस.सी.आय.टी परिक्षा पास करायचे व त्याच्यासाठी कॉर्पोरेशनतर्फे शिक्षण देण्यांत आले. पंरतु आपण ज्या कामाकरिता तंत्रज्ञान अधिकारी नेमतोय व जी भूमिका साध्य करण्याचा प्रयत्न करतोय पण आपल्याकडे संगणक नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत इ-गव्हर्नस करण्यांत यशस्वी झाले त्यांना चिफ मिनिस्टर यांचे मार्गदर्शन मिळाले होते. तरी आपण देखील त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. जन्म-मृत्यु विभागातर्फे फारशी तक्रार दिसून आलेली नाही. आपल्याकडे संगणक नाही व आपण सध्याच्या बजेटमध्ये तशी तरतुदही केलेली नाही. तंत्रज्ञान अधिकारी आपणाला कशाला पाहिजे. पुढील अर्थसंकल्पात आपण तरतुद करा व नंतर आपण तशी भुमिका घ्यावी. जर आपण तंत्रज्ञान अधिकारी नेमत असाल तर माझ्या ह्या भुमिकेला पूर्णपणे विरोध आहे. महाराष्ट्र शासनाला आपण कळवायला पाहिजे व त्यानंतर आपण तसा प्रोग्राम राबविला पाहिजे. आपल्याकडे पाच ते सहा संगणक आहेत. ते पाच-सहा संगणक ऑपरेट करण्यासाठी तंत्रज्ञान अधिकारी येणार आहे का?

**मा. सभापती :-**

वैती साहेबांनी माहिती दिली त्यात ते जे बोलले पण हा विषय अतिशय सुस्पष्ट आहे. आपण त्यांना संगणक ऑपरेट करायला सांगणार असे नाही आणि बजेटमध्ये संगणकीकरण करण्यासाठी पन्नास लाखाची तरतुद केली आहे. विषय असा आहे की, हे जे एक्सपर्ट आहे ते आपल्याकडे आले तर त्यांच्याकडून आपल्याला माहिती मिळवायची आहे असे संगणकीकरण केले तर कोणते फायदे तोटे होतील ते आपणाला बघायचे आहेत. हवे असल्यास आपण तीन महिन्याचा कालावधी घेऊ व ते आल्यानंतर संगणकीकरणाला सुरुवात होईल. संगणकीकरण होणार नाही हा विषय नाही. एखादा एक्सपर्ट आपल्या शहरामध्ये आहे आणि त्याच्याकडून आपल्याला माहिती मिळाली तर अतिशय चांगले होईल. ती माहिती तुमच्या आमच्या समोर येईल व आपल्यापुढे ती माहिती आल्यानंतर ते डेव्हलप करायचे किंवा नाही करायचे तो आपला प्रश्न आहे. बजेटमध्ये तरतुदीचा विषय वेगळा आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

हमारा उसे यहाँ लाने में विरोध नही है। पर संगणक भी तो चाहिए ना। और इस कालावधी में हमे उसे पगार तो देना है तो उस मे हमारा विनाकारण खर्च होगा।

**लिओ कोलासो :-**

आमचे ही असेच म्हणणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यावेळी आपण डॉ. बावस्कर साहेबांची माहिती दिली होती. त्यावेळी सविस्तर असे विश्लेषण केले होते. येथे फक्त अधिकाऱ्याचे नांव दिले आहे. त्याची शैक्षणिक पात्रता, बायोडेटा वगैरे काहीच दिलेले नाही. आपल्याला त्यांना मानधन द्यायचे आहे किंवा जे काय सुविधा त्यांना द्यायचे आहे ते आपल्याला ठरवायचे आहे. ते उद्या आपल्या कर्मचाऱ्यांना कंट्रोल करणार आहे. आपण दाखला नावामध्ये बदल होतो त्याकरिता नाहक त्रास त्या व्यक्तिला झेलावा लागतो व कोर्टात ॲफीडेव्हीट करुन घ्यावे लागते. अशा ज्या चुका होता त्या चुका होता कामा नये. आपला जो अधिकारी नेमतोय तो सक्षम, कार्यक्षम आहे का नाही, त्याच्याकरिता बायोडेटा देणे गरजेचे आहे.

**मा. सभापती :-**

आपण त्यांना तात्पुरत्या स्वरुपासाठी घेतोय. कायम स्वरुपी घेत नाही. एखाद्या कंपनीला डेव्हलप करायचे असेल तर आपण त्याची माहिती घ्यावी.

**धनराज अग्रवाल :-**

ऐसी कौनसी जानकारी है जो वो डेव्हलप करके जाएगा। आपण ठेकेदाराला बेसीक दर ठरवून देतो दर महिन्याला दोन-चार हजार रुपये तो घेतो.

**मा. सभापती :-**

साहेब आपल्याला संगणक चालवायचे आहे आणि आपल्याला ह्या महानगरपालिकेचा फायदा करुन घ्यायचा आहे.

**जेम्स कोलासो :-**

सभापती साहेब मी धनराज अग्रवालजी, चंद्रकांत वैतीजी यांच्या मताशी सहमत आहे. आपण घनकचरा प्रकल्पासाठी देखील अशीच घाई केली होती व डॉ. बावस्करांची नेमणूक केली. आपण ह्या विषयात घाई न करता त्यांची संपूर्ण माहिती द्यावी व त्यांची योजना व पॉलिसी काय आहे ते आपण बघा. कारण आपण अशी बरेचसे काम ठेकेदाराला दिले आहे व प्रत्येक ठिकाणी आपण कामाचा ठेका देत आहोत.

**लिओ कोलसो :-**

केळकर साहेब बोलत होते आपली समिती निर्णय घेण्याकरिता सक्षम आहे. म्हणून आपल्यासमोर हा विषय आलेला आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इस तरह के विषय मंजुरी के लिए स्थायी समिती सदस्य की मंजुरी चाहिए। आपने जो इस तरह सविस्तर जानकारी दि है उसका फायदा हम जानते है। बहुतसे काम मे हम त्रुटीया निकालते है। उसका अभ्यास महानगरपालिकेने करना चाहिए। बायोडेटा की जानकारी पहले ही देनी चाहिए थी और हमें उसके उपर स्टडी करने के लिए वक्त मिलता। वो हमे छह महिने मे क्या बताऐंगे। हमारा उन्हे यहा लाने मे विरोध नही है पर हमे स्टडी करने के लिए वक्त चाहिए।

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेत सुस्पष्ट अशी माहिती आणा व विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९१ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

किती भाडे दिले आहे, किती महिने राहिले ते सर्व आपण सविस्तर माहिती द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

इसे तीन साल से मुदतवाढ मिल रहा है। इसे ठेके को आप कॅन्सल करो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ऐसा कोई भी प्रोव्हिजन नही है भाडा लेने का ऐसे आपने टिपणी में दिया है और फिर आप भाडा कैसे मांग रहे हो।

**गोविंद परब :-**

स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. आपण त्यांच्याकडून भाउे का घेत नाही. (स्थायी समिती ठराव क्र. १३८)

**लिओ कोलासो :-**

ठरावात म्हटले आहे त्याच्याकडून विजेचे आणि पाण्याचे बिल घ्यावे असे.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेंट हे जसे त्याला बंधनकारक असते तसे आपल्यालाही बंधनकारक आहे. ते त्या इमारतीमध्ये राहतात त्यामुळे त्या जागेचे रक्षण केले आहे असे येथे भासवले गेले आहे. एक माणूस तिथे राहतो तो तीन पाळ्यांमध्ये ड्युटी करतो व तो त्याची ड्युटी करण्यासाठी सक्षम असेल पण त्याने आपली ड्युटी संपल्यानंतर बोऱ्या बिस्तरा उचलून निघून जायचे असते. ते लोक भाड्याने राहायला गेले तर पंधरा हजार रुपयांपेक्षा जास्त भाडे द्यायला लागेल. तुम्हांला त्याच्याकडून जास्तीत जास्त भाडे घ्यायचे आहे ते घ्यावे आणि तुम्ही ती बिल्डींग सख्त लॉक ॲण्ड की मध्ये टाका. ऑन ड्युटीमध्ये रायफल तिथे ठेवतात. मी बघितले आहे, एखादी रायफल तिथे ठेवणे कितपत संयुक्तिक आहे. उद्या जर काही घडले तर ते आपल्याला किती महाग पडेल. बंदुक रक्षक आपली बंदुक असे टाकतात ह्याबद्दल आता मी काही बोलणार नाही. एकदा मी तिथे कार्यालयामध्ये जाऊन बघितले आहे, तिथे काय काय चालते ते. उद्या काही झाले तर आपले अधिकारी मरतील. आपण त्यांना पैसे देतो.

**जेम्स कोलासो :-**

सभापती साहेब ह्या इमारतीबाबत दोन तीन वेळा आपल्याकडे प्रपोझल आले होते. रेशन ऑफीस कार्यालयीन कामकाजासाठी भाड्यने द्या पण संपूर्ण बिल्डिंग भाड्याने घेत असेल तर द्या अन्यथा द्यायचे नाही असे म्हटले गेले. ठरावामध्ये फक्त रक्षकांचा ठेका आहे त्यांना राहण्याच्या व्यवस्था करायचे असे काही नाही. मग ते तिथे राहायला कसे गेले.

**शिवप्रकाश भुदेका :-**

त्यांना चावी कोणी दिली.

**जेम्स कोलासो :-**

अगोदर आपण त्यांचे राहिलेले भाडे वसुल करा.

**चंद्रकांत वैती :-**

ते महानगरपालिकेच्या परवानगीने राहतात का?

**मिलन म्हात्रे :-**

लेखी परवानगी दिली आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्यामध्ये रेशन ऑफीस इंटरेस्टेड होते त्यांना देखील आपण ती बिल्डींग दिली नाही.

**शशिकांत शहा :-**

आम्हांला येथे राहायला जागा द्या असे लेखी स्वरुपामध्ये आपल्याकडे आले होते का?

**गोविंद परब :-**

असे काहीच आले नाही.

**मा. सभापती :-**

परबजी आपल्याकडे लेखी स्वरुपामध्ये त्यांनी मागणी केली आहे का ते आपण बघा.

**शशिकांत शहा :-**

आपल्या अटीशर्ती भाडे वापर वसुली असे सर्व लिहिले का? त्यांच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये तर तस काहीच नाही आणि अटीशर्तीमध्ये तसे काहीच नसेल तर आपण स्थायी समितीमध्ये हा विषय घेण्याचा काहीच अर्थ राहत नाही. आपण त्यांना राहायला जागा स्वेच्छेने दिली आहे तर भाडे वसुली कसे करणार व तो विषय आमच्यासमोर कशा करिता आणला. आपल्या अटीशर्ती त्यांना

राहायच्या जागेच्या काहीच नाही तर हा विषय सभागृहात आणून त्यांच्यावर अननेसेसरी चर्चा होत आहे. ह्या विषयाचा आपण खुलासा करावा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सभापती साहेब हमे इससे एक अच्छा रेव्हेन्यु मिल सकता था। आयुक्त महोदय ने अच्छा आशय दिया अगर इनकेस इनको टेंडर नही मिलता तो आप कैसे वसुली करते। उन्होंने रहने के लिए आप के पास माँग की है क्या? मिलन म्हात्रे जी ने बोला कि मैने जाकर देखा जरुरी नही है जाकर उनकी बंदूक देखनेकी। यह सब हम लोगोंका काम नही है। वो अपनी बंदूक घरमें रखें या घरमें उसका बच्चा वह बंदुक ले रहा है। उससे हमे क्या करना है। जगह आपकी है वह जगह आप अपने पास रखिए। सभापती महोदय आप इसका अच्छी तरह निर्णय लिजिए। अगर इन्हे दो महिने तक टेंडर नही मिलता है तो आप कहाँ से पैसे वसुल करते। कोई भी अधिकारी तक्रार करके उसको निकाल सकता था। यह गोषवारा आप आज कॅन्सल किजीए। दो महिने की मुदत है और यह टेंडर दुसरे को मिलता और वो निकल जाता तो आप यह सब रक्कम कहॉ से वसुल करते।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जे असं बोलता ना तर सर्वांना येथे आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. दुसऱ्यांची हत्यारे आपल्या बिल्डींगमध्ये ठेवण्याचा ठेका घेतला आहे का?

**मा. सभापती :-**

तुम्ही बोलतांना माझ्याशी बोला.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी माझे नांव घेतले आहे. आपल्या जागे मध्ये कोणीही हत्यार ठेवणार तर आम्ही तसं चालू देणार नाही. त्या माणासाने ती जागा इलिगल पद्धतीने वापरली आहे. आपण त्यांच्याकडून भाडे वसुल करुन घ्या. दोन हजार साली माझ्याकडून पत्र गेले आणि सत्संगवाल्यांकडून आठ हजार रुपये महानगरपालिकेने वसुली केली. एक पैसा सोडणार नाही. तुम्ही हा विषय आमची हरकत न घेता मंजुर करा आम्ही त्याच्यावर अपील करु. ज्या कुठल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात ती बिल्डिंग असेल त्याच्या पगारातून तुम्ही ते पैसे काढा.

**मा. केळकर सो. (उपायुक्त) :-**

सन्मा. सभागृह या विषयावर विस्तृत अशी चर्चा झालेली आहे. मी समितीसमोर खुलासा करु इच्छितो ही निविदा बघितली त्यात कोणत्याही तऱ्हेचे राहण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची तरतुद नव्हती. त्यांनी परस्पर ताबा घेतला आणि रक्षक रहात असल्याचे मला कळले. दि. २८/०३/२००३ रोजी स्थायी समिती ठराव क्र. १३४ नुसार कार्यवाहीची पुर्तता करण्यासाठी हा ठराव आला आहे. बॉम्बे सिक्युरिटीने महानगरपालिकेचे जुने कार्यालयाचा वापर केल्याने वसुली करणेबाबत अंतिम मंजुरी प्रदान करावे. (ठरावाचे वाचन करुन दाखविले.) ठरावानुसार भाडे आकारले आहे व आता त्याला सभागृहाने मंजुरी द्यायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या भाईंदरमध्ये बँकेच्या सिक्युरिटीचे ऑन ड्युटीमध्ये त्यांचे हत्यार हे देखील आपल्याकडे असते. मी कुणावर टिका करत नाही किंवा कुणाचे फेवर घेत नाही.

**मा. केळकर सो. (उपायुक्त) :-**

बांधकाम विभागाने भाडे काढले आहे एकूण दोन हजार चौरस फुट जागा वापरली त्यावर आकारणी केली असता २८ हजार रुपये प्रति माह एवढे भाडे लागू होते.

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर विस्तृत चर्चा झाली आहे. मागच्या वेळेला आपण ठराव केला होता ही सिक्युरिटी आहे. ते महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये राहत आहेत. त्यांच्यावर भाडे आकारणी करुन त्यांना मुदतवाढ द्या असे होते. सन्मा. सदस्यांनी हा ठराव मांडल्यानंतर आयुक्त साहेबांनी आपल्याकडे विषय आणला आहे. हा ठराव तुम्ही मांडला आहे आणि तुम्ही त्याच्यावर अंमलबजावणी करायची आहे. ते भाडे घ्यायचे आपण ठरविले व त्यांना आपण मुदतवाढ दिली आहे. परंतु त्याला अंतिम ध्येय देतांना आपल्याला ह्या अटीशर्ती फुलफिल करायचे आहे. त्यांनी मागणी केली आहे असे नाही आहे. जर त्या कंपनीमध्ये मी सर्व्हीस करतो व त्यांच्याकडे छोटीशी जागा असेल तर आपण त्याचा वापर करतो. हे जे भाडे आकारले आहे ते तुम्ही सेल्स टॅक्स वगैरे कोणाला पण द्या तरी एवढे भाडे मिळत नाही. तो आपल्याकडे राहतो व आपल्याला सर्व्हिस देतो. त्याने कुठे सामान ठेवले आहे तो मुद्दा वेगळा आहे. म्हात्रेजी आपण जो मुद्दा मांडला तो चांगला आहे. पण एखादी बिल्डींग वापरात असली तर ती चांगली राहते व अन्यथा ती बिल्डिंग खराब

होते. आपण त्यांना मॅक्झीमम जे भाडे आहे ते आकारा. ठेकेदार आपल्याला सिक्युरिटी ठरवतो व ती जागा रिकामी आहे म्हणून वापरतो ते ठिकआहे. आपण त्यांना भाडे आकारु व कार्यवाही करु.

**अशोक पाटील :-**

ती जागा ओसाड आहे म्हणून सिक्युरिटी वाले वापरतात. कुणाची ही परवानगी नसतांना ती जागा आपण रिकामी का ठेवली आहे. आपण ती जागा भाड्याने दिली तर त्याच्यापासून आपल्याला रेव्हेन्यु मिळू शकतो. आपण हा विषय पुन्हा विचारासाठी घ्या.

**मा. सभापती :-**

आता ह्या जागेवरुन सिक्युरिटी खाली झाली पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

मुदतवाढ वाढवून दिली त्या कालावधीचे भाडे वसुल करणार का आधीपासून भाडे घेणार?

**शरद पाटील :-**

मुदतवाढ झाल्यापासून भाडे घेणार का? कधीपासून भाडे घेणार?

**मा. केळकर सो. (उपायुक्त) :-**

बांधकाम विभागाने रेट ठरविला आहे.

**लिओ कोलासो :-**

म्हात्रेजी आपण जो महत्वाचा मुद्दा मांडला आहे आणि त्यांचे रायफल येथे राहते. आपण ॲग्रीमेंटमध्ये असे केले होते का? आपण त्यांच्याकडून भाडे मागवित आहोत. सिक्युरिटी वाल्यांना आपण पाच हजार रुपये ठरविले आहेत पण ठेकेदार त्यांना तीन हजार रुपये पगार देतो आणि त्याच्याकडे आपण चोवीसशे रुपये असे मासिक भाडे ठरवावे.

**मा. सभापती :-**

चोवीसशे रुपये भाउे घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण चोवीस हजार वरुन एवढे कमी कसे करता.

**मा. सभापती :-**

पाच हजार रुपये याप्रमाणे भाडे वसुल करण्यांत यावे.

**मिलन म्हात्रे :-**

कधी पासून वसुली करणार आहात.

**मा. केळकर सो. (उपायुक्त) :-**

सन २००१ पासून वसुली करणार आहोत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

भाडे वसुली करा आणि त्यांना तुम्ही वॉर्नींग द्या व त्यांच्यावर तुम्ही जातीने लक्ष द्या.

**प्रकरण क्र. ९१ :-**

महानगरपालिका कार्यालयात राहत असलेल्या सुरक्षा रक्षकांचे भाडे, पाणी व विजेचे बिल निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महत्वाचे वास्तुचे संरक्षणाकरिता ठेका पद्धतीने सुरक्षा रक्षक मे. बॉम्बे इंटेलिजन्ट सिक्युरिटी (इ.) लि. यांचे मार्फत करण्यांत येत होता. परंतु दि. २८/०३/२००३ चे मा. स्थायी समिती सभेत नविन निविदा मागविण्याचे पूर्वी मुदतवाढ देण्यांचा ठराव पारित झाला. त्यामध्ये बॉम्बे इन्टेलिजन्टस सिक्युरिटी (इ.) लि. ह्या सुरक्षा रक्षक पुरवठा करणाऱ्या कंपनीचे सुरक्षा रक्षक महानगरपालिकेच्या जुन्या कार्यालयात रहात असून विज व पाण्याचा वापर करतात. त्याबद्दल त्याचेकडून भाडे वसूल करावे अशाप्रकारे सभागृहाने ठराव पारीत केला आहे.

ह्या विषयावर साधक बाधक चर्चा होऊन बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी यांचे सोबत तात्कालिन नगरपालिकेने केलेल्या करारामध्ये भाडे वापर वसुल करणेची शर्त नव्हती. परंतु महानगरपालिकेचे इमारतीचा वापर केला असल्याने, वीज पाणी वापरलयाने ह्याचे एकत्रित भाडे (त्यामध्ये भाडे, वीज व पाणी याचा समावेश) प्रती महिना रु. ५,०००/- (रु. पाच हजार मात्र) प्रमाणे माहे जानेवारी २००१ ते जून २००३ पर्यंतचे एकूण बील त्यांचे अंतिम देयकातून वसुल करुन घ्यावे अशी सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र.९२ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सदरचा विषय सभेत आला आहे. आणि तातडीचा विषय आहे असे गोषवाऱ्यामध्ये दिले आहे. जवळजवळ महासभेला १९/४/०३ रोजी हा विषय सादर करण्यात आला होता. १७/५/०३ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली व जवळजवळ अडीच ते तीन महिने आपले असेच गेले आहे. आणि आता परत ही निविदा मंजुरीसाठी आलेली आहे. परत आपल्याला आणखीन दहा ते पंधरा दिवस लागणार आहेत. म्हणजे जवळजवळ वीस जुलै पर्यंत हा कार्यक्रम पुढे जाईल. आपल्याला गोषवारा देण्यामध्ये चुक झाली आहे असे मला वाटते. आपण एकुण चार झोन केले आहेत आणि त्या झोनवाइस प्रत्येक झोनला टेंडर नेमायचे आहे. गोषवारामध्ये दिले आहे, निविदेतील लिफाफा क्र. १ मधील तांत्रिक कागदपत्राची छाननी करणे, कागद पत्रे तपासणे आदी कामास काही दिवसाचा कालावधी लागणार आहे. तर एवढा उशीर लागण्याचे कारण काय? आपण हे टेंडर रिकॉल करुन टाका, कशाला ठेवता आहात.सभागृहानेयोग्य वेळेला निर्णय घेतला आहे. आता ह्याच्यामध्ये हा जो काय कालावधी गेला आहे. त्याच्यामध्ये दीड तेदोन महिने गेले आहे. आपण जरा हे क्लिअर करा.

**डॉ. बावस्कर :-**

सुरुवातीला एकुण ११७ अर्ज विकण्यांत आले व ज्यादिवशी निविदा स्विकारायची होती त्यादिवशी एकुण तीन निविदा आल्या व ह्या तीन निविदा आपण स्विकारु शकत नाही म्हणुन पुन्हा जाहिर निविदा दिली.

**मिलन म्हात्रे:-**

कुठल्या पेपरमध्ये जाहिरात दिली आहे.

**डॉ. बावस्कर :-**

सकाळ, लोकमत, नवाकाळ, दैनिक सुरज प्रकाश जवळ जवळ सहा सात पेपरात जाहिरात दिली आहे. एकूण ४४ निविदा प्राप्त झाल्या व फोरनिविदा मागविण्यामध्ये १० ते १५ दिवसांचा कालावधी जास्त लागलेला आहे. एकुण १० झोन करण्यांत आलेले आहेत. भौगोलिक रचना व कामाचे सोईसाठी गट क्र. ३ व गट क्र. १० चे प्रत्येकी दोन भाग करण्यांत आलेले आहेत. फेरनिविदा मागविल्यानंतर ऑडिटर कडुन ऑडीटचे काम पुर्ण झाले आहे सुरुवातीला जर चांगला प्रतिसाद मिळाला असता तर बरोबर १ जुलै पासुन काम करावे ह्यादृष्टीने आपण कामकाज केले होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपले जेवढे डिपर्पार्टमेंट आहेत त्याच्याबाहेर आपण नोटीस बोर्ड लावा. मुख्य कार्यालय येथे नोटीस बोर्ड नाही. महत्त्वाचे कागदपत्र निघतात आम्हाला काहीच माहिती पडत नाही. आपल्या महानगरपालिकेचे तहसील ऑफिसमध्ये फॉर्म मिळतात त्यावेळी आम्हाला समजते व तो फॉर्म मिळविण्याकरीता देखील आम्हाला त्रास होतो. प्रत्येक डिपार्टमेंटला नोटीस बोर्ड लागले पाहिजे. मा. आयुक्त साो., मा. महापौर साो. ह्यांच्या हस्ते फोटोपासचे वाटप झाले व त्यांचे आमंत्रण पत्रिका मला दोन दिवसांनी मिळाली आणि मला त्या ठिकाणी उपस्थित राहायचे होते तरीदेखील इच्छा असताना उपस्थित राहु शकलो नाही. केळकर साहेब नोटीस बोर्ड लावण्याचा चार्ज आपल्याकडे आहे. त्याकरिता आपण नोटीस बोर्ड लावले तर अतिशय चांगले होईल.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, स्थायी समिती में जब टेंडर निकालनेकी अनुमती देती है तब नोटीस बोर्डपर लगना चाहिए पर वैसे नही होता है । १९/४/०३ में हमने विषय महासभेमें पास किया है । स्थायी समिती में ५/४/०३ को ठराव करके तीन महिनेकी मुदतवाढ देने के लिए मंजुर किया । जिसमें मैने पुछा था की टेंडर कैसे आता है । तो आपने कहा था की एक ही टेंडर आता है तो हम क्या करे । और अभी आपने कहा की पहिले तीन टेंडर आए और सत्तर टेंडर आए और आप उसमें से चुज भी नही कर पा रहे हो की टेंडर किसे देने का और किसे नही । मिनिमम वेजेस किसका लागु है । वो कॉन्ट्रॅक्टर पर लागु है, हमारे पर लागु नही है ।

**डॉ. बावस्कर :-**

स्पर्धा होण्याचे दृष्टीने निविदाकारांनी त्यांचे दर कमी भरलेले आहेत. त्यामुळे त्यात महानगरपालिकेचाच आर्थिक फायदा झाला आहे. सुरुवातीला फक्त तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. आपण फेरनिविदा मागविल्या त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. व त्याच्यात महानगरपालिकेचाच आर्थिक फायदा झाला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

प्रत्येक वेळेला स्थायी समिती मुदतवाढ देते असे पेपरात येते. त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज निर्माण झाला आहे की, आपण सारखे मुदतवाढ का देतो?

**मा. सभापती :-**

कोणत्याही पेपराचा आशय आपण सभेत घेऊ शकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मागे विषय झाला होता त्यावेळी आपण हा विषय सभेत आणला होता. मग तो विषय तुम्हीपण घेतला नाही पाहिजे होता. मुदतवाढ नियमबाह्य असेल तर आम्हाला मंजुर नाही.

**मा. सभापती :-**

हे नियमबाह्य कसं आहे आणि कसं नाही ते आपण आम्हाला सांगा.

**धनराज अग्रवाल :-**

ते सांगणे आमचे काम नाही अधिका-याचे काम आहे. मुदतवाढ नियमबाह्य नसेल तर दया. आणि नियमबाह्य असेल तर आमचा विरोध नोंदवा.

**शरद पाटील :-**

नियमात बसत असेल तर मुदत वाढ दया. जर ते नियमात बसत नसेल तर आमचा विरोध आहे.

**मा. सभापती :-**

प्रत्येक काम करताना या शहराची जबाबदारी ही आपल्यावर आहे. आपण एखादा विषय असेल व जर तो नियमात आहे तर त्यांच्यात आपण सहभाग घेतला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

अधिका-यांना बोलु दे हा विषय नियमात बसतो असे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत असे प्रकरण घडले आणि अधिकारी व नगरसेवक ह्यांना जेलमध्ये जावे लागले. आम्हाला असे जेलमध्ये जाण्याची इच्छा नाही.

**अशोक पाटील :-**

नविन निविदा मागितली आहे आणि त्याची पुर्तता होईपर्यंत आपल्याला मुदतवाढ पाहिजे तर ते देणे आपल्याला गरजेचे आहे.

**डॉ. बावस्कर :-**

निविदा मागविली आहे. त्यावर संपूर्ण कार्यवाही पूर्ण झालेली आहे. पण पुढच्या सभेत विषय येईल व त्यानंतर पुर्तता होईल त्याकरिता वेळ जाईल म्हणुन मुदतवाढ मागितली आहे.

**मा. केळकर सो. (उपायुक्त):-**

पंधरा दिवसाची मुदतवाढ त्यांनी आपल्याकडुन मागितली आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

अशी मुदतवाढ देण्याचे नियमात असेल तर त्याला आमचा विरोध नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, मा. उपआयुक्त साहेब सदरच्या विषयास कंत्राटपद्धतीने गटनिहाय साफसफाई करण्याची प्रसिद्धी आणली व हा प्रस्ताव एक महिन्यापासुन रेंगाळतोय. पाऊस चालु झाला आहे. व शहरात साफसफाई होणे अत्यंत गरजेचे आहे. पाऊस पडल्यानंतर मिरा रोडला गुडघाभर पाणी साचले. बारा बारा तास मजुर काम करतात तर रस्त्यावर पाण्याचा निचरा होत नाही ही गंभीर बाब आहे. मजुरांना मुदतवाढ देणे गरजेचे आहे. अन्यथा शहरात घाणीचे सांम्राज्य पसरेल. अधिका-यांनी ही सदर विषयात आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहुन काम बघावे व आपण शहराचे विकासाच्या दृष्टीने शहानिशा करुया. आपण आधी देखील अशी मुदतवाढ दिली होती व ऑडीटर साहेबांनी त्याच्यावर शेरा मारला होता की, कलम ७२ (ब) मध्ये तशी तरतुद नाही. तर ते देखील आपण तपासून घ्यावे. डॉ. साहेब आपण मिरा रोड या विभागात जास्त लक्ष दयावे.

**मा. केळकर सो. (उपायुक्त):-**

सन्मा. सदस्य वैती साहेब आपण जी सुचना केली कलम ७२ (ब) मध्ये अशा त-हेचा अधिकार स्थायी समितीला कायदेकृत केले आहे. केवळ आपल्याला ह्याकामाकरिता पंधरा दिवस पाहिजे व ह्या कामाची जी प्रोसिजर आहे ती पुर्ण झालेली आहे. फक्त स्थायी समितीसमोर विषय आणुन मंजुर करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महानगरपालिकेमध्ये महासभा आणि स्थायी समिती ह्याच्यापैकी नेमके कर्तव्य कुणाचे आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, सभेमध्ये ब-याच वेळेला चर्चेला विषय आहे की, महासभा आणि स्थायी समितीची कर्तव्ये कोणती? तर महासभेला प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देता येते व स्थायी समितीला एजंसी ठरविण्याचा पूर्ण अधिकार आहे. महासभेच्या धोरणात्मक निर्णयावर निविदा मागवुन मंजुरी द्यायची आहे आणि आपण जे काही काम करत आहोत ते कायद्याला धरुनच करत आहोत. कायद्याचे बाहेर जाईल असे कोणतेही काम आपण करत नाही.

**मा. सभापती :-**

सदरच्या कामाकरिता पंधरा दिवसाची मुदतवाढ देण्यात यावी.

**प्रकरण क्र. ९२ :-**

ठेका पद्धतीने मजुर पुरवठा करीत असलेल्या कंत्राटदारांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कंत्राटपद्धतीने गटनिहाय साफसफाई करणे कामाचा प्रस्ताव दि. १९/०४/२००३ च्या महासभेत सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावात दि. १९/०४/२००३ च्या ठराव क्र. ०३ अन्वये मंजूरी दिली होती. सदर ठरावाच्या अनुषंगाचे आरोग्य विभागातर्फे दि. १७/०५/२००३ रोजी महापालिका क्षेत्रातील कंत्राट पद्धतीने गटनिहाय साफ सफाई करणे कामाची निविदा नोटीस प्रसिद्ध करण्यांत आली होती. सदर कामाच्या एकूण तीनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदरची बाब दि. २२/०५/२००३ रोजी मा. आयुक्त सो. यांचे निदर्शनास आणली असता मा. आयुक्त सो. यांनी सदर कामाच्या फेर निविदा मागविणे बाबत आदेश दिले. त्यानुसार दि. ०५/०६/२००३ रोजी निविदा प्राप्त झाल्या आहेत.

दरम्यान दि. ३१/०३/२००३ रोजी कंत्राट पद्धतीने मंजुर पुरवठा करणा-या ठेकेदाराच्या कामाची मुदत संपत असल्याने मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा. स्थायी समिती दि. ०५/०४/२००३ ठराव क्र. १५३ अन्वये दि. ०१/०४/२००३ पासून पुढील ३ महिन्याच्या कालावधी करीत सन २००१-२००३ या आर्थिक वर्षात कार्यरत असलेल्या ठेकेदाराच्या मंजूर दरात कंत्राट पद्धतीने वार्ड साफ सफाई करीता मजुर पुरवठा करण्याबाबत ठराव पारीत करण्यांत आला होता. सदर ठरावा अन्वये कामाची मुदत ३०/०६/२००३ रोजी पुर्ण होत आहे. कंत्रात पद्धतीने गट निहाय वार्डसफाई करणे कामाच्या फेर निविदेत प्राप्त झालेल्या निविदेतील लिफाफा क्र. १ मधिल तांत्रिक कागद पत्रांची छाननी करणे, कागद पत्रे तपासणे आदी कामास काही दिवसाचा कालावधी लागणार आहे. तसेच दरा संबंधितचा लिफाफा उघडून त्यातील निविदा काहींनी भरलेले दर तपासून मा. स्थायी समिती यांचेकडे तुलनात्मक तक्ता, गोषवारा पाठविणे त्यास मंजुरी घेणे, मंजुर निविदाकारास कामाच्या कार्यादेश दिल्यानंतरही मंजुर निविदाकारास कामगार व साहित्य जमविणे कामी काही कालावधी जाण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेण्यांत सध्या ठेका पद्धतीने मजूर पुरवठा करत असलेल्या कंत्राटदारांना वार्ड साफसफाई करणे कामी मजुर पुरवठा करणे तसेच संत गाडगेबाबा नागरी स्वच्छत अभियना करिता घेतलेले मजुर पुरवठा करत असलेल्या ठेकेदारास मंजूर दरातच पुरवठा करण्याबाबतच्या कामास एक महिन्याची मुदतवाढ त्या कामी येणा-या खर्चास मा. स्थायी समितीची मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९३ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय नक्की ह्याकामाचे प्रोसेस काय आहे. ब-याच वेळा हा विषय सभागृहामध्ये आला आहे. एकंदरीत विषय काय आहे.

**शरद पाटील :-**

आतापर्यंत ह्या तलावाला किती खर्च केला आहे. ते आपण सांगा.

**मा. केळकर साो. :-**

माहिती घेऊन सांगतो. आता पर्यंत ह्या तलावाला चाळीस लाख रुपये खर्च आला आहे.

**दिपक खांबीत :-**

सिव्हील काम पुर्ण झाले आणि लॅन्ड स्केपचे काम चालु आहे. सुमारे चाळीस लाख खर्च येत आहे.

**शरद पाटील :-**

खेळणी बसवायची आहे. त्याची आपण आम्हाला एक कॉपी दया.

**प्रकरण क्र. ९३ :-**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रावतलाव उद्यानामध्ये खेळणी बसविण्याच्या कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८० :-**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | रावतलाव उद्यानामध्ये विविध प्रकारची खेळणी बसविणे | १०,००,०००/- |

सन २००३-०४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातून वरील कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहाण.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९४ चे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

महासभेसाठी लघुलेखक आपण नेमणार आहोत काय? महानगरपालिकेकडे सक्षम असे कोणी लघुलेखक नाही का?

**गोंविद परब :-**

महानगरपालिकेकडे आस्थापनावर लघुलेखकाची पोस्ट नाही आहे.

**दिनेश नलावडे :-**

किती संगणक चालक व किती लघुलेखकाची आवश्यकता आहे.

**मा. केळकर साो. :-**

सहा संगणकचालक व दोन लघुलेखकाची आवश्यकता आहे.

**दिनेश नलावडे :-**

आपल्याकडे सध्या आवश्यकता आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, महानगरपालिकेचे संगणक किती आहेत.

**प्र. सचिव :-**

चार आहेत.

**शिवप्रकाश भुदेका :-**

ठेकेदार महासभामें आ सकता है क्या ? उसको एन्ट्री मिलती है क्या?

**मा. सभापती :-**

संगणक प्रत्येक खात्याच्या दालनामध्ये घ्यायचा आहे. त्याकरिता हा विषय येथे आणला आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

नियमात बसत असेल तर आमची मंजुरी आहे.

**प्रकरण क्र. ९४ :-**

संगणक चालक व लघुलेखक पुरवठा करणेकामी निविदेत मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८१ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर संगणक चालक व लघुलेखक हे पद मंजूर नाही. परंतु महानगरपालिकेच्या प्रत्येक महिन्यांस होणारी महासभा व आठवड्यास होणारी स्थायी समिती सभा यांचे इतिवृत्तांत लिहिणे व ते संगणकावर टंकलिखीत करुन पुढील सभेस मंजुरी करीता देणे यासाठी महानगरपालिकेकडे सदर कामाचा अनुभव असलेला कर्मचारी वर्ग नाही. करीता ठेका पद्धतीने पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून दि. १०/०५/२००३ चे साप्ताहिक ''सुरज प्रकाश'' या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन मुदतीत प्राप्त निविदाधारकांची नांवे व तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | संगणकचालकाचा दर | लघुलेखकाचा दर |
|---|---|---|---|
| १ | मे. राज कॉम्प्युटर्स<br>बी. पी. रोड, भाईंदर (पूर्व) | रु. १९०/- प्र. दि. | रु. २००/- प्र. दि. |
| २ | मे. आदर्श प्रिंटर<br>मु. पो. जुचंद्र, ता. वसई, जि. ठाणे | रु. १७०/- प्र. दि. | रु. १९०/- प्र. दि. |
| ३ | मे. मिनल कॉम्प्युटर | रु. १८५/- प्र. दि. | रु. २००/- प्र. दि. |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा उघडण्यांत आल्यानंतर त्याची तुलना करता मे. आदर्श प्रिंटर यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु बाजार भावाशी तुलना करता सदरचे दर जास्त असल्याने त्यांचे लेखी हमीनुसार संगणक चालक रु. १६०/- व लघुलेखक रु. १८०/- या दराने प्रति दिन आठ तास या प्रमाणे संगणक चालक व लघुलेखक पुरवठा करण्यांस तयार असल्याचे कळविले आहे. त्या नुसार मे. आदर्श प्रिंटर यांचा ठेका मंजूर करुन सहा संगणक चालक व दोन लघुलेखक ठेकेदाराकडून आवश्यकतेनुसार पुरवठा करणेंस मंजुरी मंजुरी देण्यांत येते.

तसेच सध्या कार्यरत असलेले एक लघुलेखक व एक सर्वेअर यांची दोन महिन्याकरीता (दि. ०१/०५/२००३ पासून दि. ३०/०६/२००३) पर्यंत दिलेल्या मुदतवाढीस मंजुरी देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंग चौहाण. अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय आला होता त्यावेळी आपण कम्प्लाईन रिपोर्ट मागीतली त्याचे काय झाले. आपण अतिक्रमण तोडायला जातो. त्यावेळी मुख्यतः आपल्याकडे टेकनिकल अशा स्वरुपाचा स्टाफ पाहिजे. सदरच्या विषयाबाबत मी स्वतः एक पत्र दिले आहे.

**मा. सभापती :-**

केसरीनाथ म्हात्रेजी कामाची कम्प्लाईन रिपोर्ट आली पाहिजे. व सन २००३/०४ ह्या सालात आधीच्या मंजुर दरात काम करुन घ्या.

**प्रकरण क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे अतिक्रमणे काढुन टाकणेकरिता भाड्याने यंत्रसामुग्री पुरविणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ८२ :-**

दि. ०४/०६/२००३ च्या साप्ताहिक सुरत प्रकाश व दि. ०५/०६/२००३ दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करणेंत आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका

हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे काढून टाकणे करिता यंत्रसामुग्री भाड्याने पुरविणेकामी खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | तपशिल | मे. गुरुजी कंन्स्ट्र | गणेश डेव्ह. | मे. आशापुरा कंन्स्ट्र. |
|---|---|---|---|---|---|
| १) | मिरा भाईंदर मनपा हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण काढून टाकणे करीता यंत्रसामुग्री भाड्याने पुरविणे. | १) ३-डी मशीन जेसीबी | रु. १,०००/- प्र. तास | रु. ९००/- प्र. तास | रु. ९७५/- प्र. तास |
| | | २) क्रेन | रु. १,०५०/- प्र. तास | रु. ९५०/- प्र. तास | रु. १,१००/- प्र. तास |
| | | ३) डंपर | रु. ५००/- प्र. तास | रु. ४२५/- प्र. तास | रु. ४९०/- प्र. तास |
| | | ४) एम-६० पोकलन मशीन | रु. १,५००/- प्र. तास | रु. १,३००/- प्र. तास | रु. १,४२५/- प्र. तास |
| | | ५) गॅस गटर | रु. ३०/- प्र. सळई कापणे | रु. २०/- प्र. तास | रु. २८/- प्र. तास |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. गणेश डेव्हलपर्स यांचे दर सर्वात कमी आहेत. मात्र महापानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने कचरा हवारी करणेकामी निविदा मागविल्या असून जे.सी.बी. मशीन करीता सर्वात कमी दराची निविदा रु. ७००/- प्र. तास व पोकलन मशीन करीता सर्वात कमी दराच्या निविदा रु. १,२००/- प्र. तास प्राप्त झालेल्या आहेत. वरील निविदांमधील दर जास्त असल्याने सर्वात कमी दराची निविदा सादर केलेल्या ठेकेदारास दर कमी करणेसाठी वाटाघाटी करणे करीता बोलवण्यांत आले होते. वाटाघाटी नंतर त्यांनी खालील सुधारीत दराने यंत्र सामुग्री पुरविण्यांचे मान्य केले आहे.

| | सुधारीत दर |
|---|---|
| १) ३-डी जे.सी.बी. मशीन | रु. ८००/- प्र. तास |
| २) एम. ६० पोकलन मशीन | रु. १,२००/- प्र. तास |
| ३) क्रेन | रु. ७००/- प्र. तास |
| ४) डंपर | रु. ३८५/- प्र. तास |
| ५) गॅस कटर | रु. १५ प्र. सळई कापणे |

निविदा धारक यांनी वाटाघाटी नंतर दिलेले दर बाजारभावाच्या तुलनेने जास्त दिलेले आहेत. त्यामुळे अतिक्रमण विभागास साधनसामुग्री व साहित्य पुरवठा करणेकामी मागील सन २००२-०३ ह्या वर्षातील मंजूर असलेल्या दरानुसार चालू वित्तीय वर्षामध्ये यंत्रसामुग्री व साहित्य पुरवठा करणेंस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ व महाराष्ट्र लेखासंहिता अधिनियम १९७१ चे कलम १६० नुसार मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच या कामापोटी वेळोवेळी येणाऱ्या देयकांच्या प्रदानास मंजुरी देण्यांत येत आहे.

सन २००२-०३ मधील मंजुर असलेले दर

| | |
|---|---|
| १) ३-डी जे.सी.बी. मशीन | रु. ७००/- प्र. तास |
| २) एम. ६० पोकलन मशीन | रु. १,०००/- प्र. तास |
| ३) क्रेन | रु. ७००/- प्र. तास |
| ४) डंपर | रु. ३८५/- प्र. तास |
| ५) गॅस कटर | रु. १५/- प्र. सळई कापणे |

**सुचक :- श्री. हरेश लक्ष्मण गावंड.** **अनुमोदन :- श्री. दिनेश द. नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा आपणाकडुन जे कार्बन पुरविले जाते त्याची आपण कॉलिटी चेक करा. कार्बन पेपरच्या खाली आपण जो पेपर घेतो तो पेपर पुर्णपणे निळा होतो. त्यामुळे टाईप केलेले ठळक अक्षरात दिसुन येत नाही. कार्बनची क्वॉलिटी व्यवस्थित बघा.

**लिओ कोलासो :-**

अशा स्वरुपाच्या वस्तु घेताना आपण त्या वस्तु ठेकेदाराला नेमुन देतो आणि त्याप्रमाणे आपण मार्केट रेट टॅली करुन नंतर निविदा मंजुर करतो. आता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी ह्यांनी सांगितल्याप्रमाणे जर अशा प्रकारच्या वस्तुंची डिलीव्हरी होत असेल, तर तो माल येतो त्यावेळी आपण त्याची क्वॉलीटी व्यवस्थित बघुन घ्यायला पाहिजे.

**मा. केळकर सो. :-**

सॅम्पल मागविले आहे का?

**संजय गोखले :-**

होय, क्वालिटी बघुन घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

जे मटेरियल येते ते आपण चेक करा व चांगल्या क्वॉलिटीचा माल आहे का ते आपण बघा.

**महेंद्रसिंग चौहान :-**

क्वॉलिटी चेक करण्यात यावी.

**प्रकरण क्र. ९६ :-**

महानगरपालिकेस लागणारे स्टेशनरी साहित्य खरेदी करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८३ :-**

(सदरच्या ठरावाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९७ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९७ :-**

महानगरपालिकेस लागणारी विविध प्रकारची छपाई करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८४ :-**

(सदरच्या ठरावाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ९८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ९८ :-**

महानगरपालिका विविध खात्याचे बोर्डबॅनर बनवुन पुरवठा करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८५ :-**

(सदरच्या ठरावाची प्रत सोबत जोडलेली आहे.)

(प्र. सचिवानी प्रकरण क्र. ९९ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

अभी जो डिसकशन हुआ प्रभाग वाईस साफसफाई के लिए पंधरा दिन की मुदतवाढ दी है। आणि ह्या कामाकरिता दोन महिन्याची मुदतवाढ दिली आहे तर सदरच्या कामाकरिता देखील पंधरा दिवसाची मुदतवाढ देता येईल का? ते आपण बघा. हवे असल्यास एक महिन्याची मुदतवाढ दया.

**डॉ. बावस्कर :-**

निविदा आम्ही ह्या आठवड्यात देणार आहेत आणि निविदा मंजुर झाल्यानंतर दुसरा कुठलाही प्रश्न येणार नाही. म्हणुन पंधरा दिवसाची मुदतवाढ सन्मा. सभागृहाने दयावी. जर ह्या सोमवारी आपली बैठक असेल तर ह्याच आठवड्यात निविदा मंजुरीसाठी आपल्यासमोर येईल.

**दिनेश नलावडे :-**

डॉ. साहेब आरोग्याचा विषय येथे आला आहे. म्हणुन बोलतो आपण प्रभाग वाईस जे कचऱ्याचे ट्रक ठेवले आहेत ते ट्रक व्यवस्थित रिकामी केले जात नाही. कचरा आतमध्ये टाकला जात नाही बाहेर तसाच पडलेला असतो. आपण ह्याच्यावर योग्य ती कार्यवाही करा.

**चंद्रकांत वैती :-**

प्रभाग निहाय साफसफाईच्या कामाच्या निविदांना अंतिम मंजुरी मिळेपर्यंत बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे असे आपण लिहिले आहे.

**महेंद्रसिंग चौहान (प्रभारी सभापती) :-**

पंधरा दिवसाची मुदतवाढ पाहिजे असे बावस्करांनी आपल्याला सांगितले आहे.

**मा. केळकर सो. :-**

आरोग्य विभागाला पंधरा दिवसाची मुदतवाढ पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

पंधरा दिवसात प्रोसेस होईल का?

**महेंद्रसिंग चौहान (प्रभारी सभापती) :-**

साफसफाई मॅटर है इसलिए आप एक महिना लिजिए । एका महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी.

**तुळशीदास म्हात्रे :-**

अहो आपण मागे ज्या घंटा गाड्या सुरु केल्या होत्या त्या आमच्याकडे येत नाही.

**महेंद्रसिंग चौहान (प्रभारी सभापती) :-**

घंटागाडीचे काय झाले.

**डॉ. बावस्कर :-**

चौकशी करुन सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

घंटा गाडीवाले घंटा वाजवत नाही. घंटा वाजवायला आम्हाला त्यांना सांगायला लागते. सभापती साहेब प्रत्येक प्रभागात ते फिरतात, ते कर्मचारी गाड्यांमध्ये लटकतात. उद्या समजा एखाद्याचे काही झाले तर आपल्यावर त्याची जबाबदारी येईल. मी आपल्याला सुचना देतो, गाड्यांमध्ये तुम्ही त्यांना लटकायला सांगु नका.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब त्या गाडीला किंवा मजुराला जर काय झाले तर त्याची संपुर्ण जबाबदारी ही त्या ठेकेदाराची आहे अस आहे ना.

**प्रकरण क्र. ९९ :-**

साफ सफाईच्या कचरा वाहतुक करणे कामी भाड्याने घेण्यात येणारी वाहने प्रभाग निहाय साफ सफाईच्या कामाच्या निविदांना अंतिम मंजुरी मिळेपर्यंत मंजुर दरात भाड्याने घेणेबाबत.

**ठराव क्र. ८६ :-**

महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरात घरोघरी जाऊन थेट पद्धतीने कचरा वाहतुक करणे कामी मनपाच्या १० डंपर व ३ टेम्पो मार्फत कचरा वाहतुक केली जात होती. सदरच्या वाहनांची संख्या अपुरी असल्याने शहरात जमा होणारा कचरा, गटारातून निघणारा गाळ, औद्योगिक परिसरातील कचऱ्याची नियमित वाहतुक करणे शक्य होत नव्हते. या करीता मनपा क्षेत्रातील सर्व प्रभागातील सार्वजनिक साफ सफाईची कामे तसेच घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेची कामे खाजगी करणामार्फत करण्याचा प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्तावास तसेच निघणाऱ्या निविदात अंतिम मंजूरी मिळेपर्यंत किमान दोन महिन्याकरिता वाहने भाड्याने घेणे या कामी दि. २१/०२/२००३ रोजी दै. लोकमत मध्ये जाहिर निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार मे. गुडलक कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी दराची निविदा रु. १४५५/- प्रतिदिन प्रत्येक वाहन दर मा. स्थायी समितीने दि. ०५/०४/२००३ ठराव क्रमांक १४८ अन्वये ४० ते ५० दिवसांकरीता मंजूर करण्यांत आला होता. त्यानुसार मे. गुडलक कन्स्ट्रक्शन यांनी वाहन पुरवठा केला आहे.

प्रभाग निहाय साफसफाईच्या कामाच्या निविदांना अंतिम मंजुरी मिळेपर्यंत बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी सदर कंत्राटदारास मंजुर दरातच आरोग्य विभागाकरिता कचरा वाहतुक करणेकामी भाड्याने वाहने पुरवठा करणे बाबत प्रभाग निहाय साफ-सफाईच्या कामांची सुरुवात होईपर्यंत मुदत वाढविणेंस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १०० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १०० :-**

सन २००३/०४ या वर्षाकरिता कर विभागाच्या संगणकीय कामासाठी मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २००३-०४ या वर्षाकरिता कर विभागाची मागणी रु. ४९.४३ कोटी इतकी होती. या एकूण मागणी पैकी रु. २९.७८ कोटी इतकी वसुली झालेली आहे. सन २००३-०४ या आर्थिक वर्षात थकबाकी सह मालमत्ता कराची वसुली रु. ४८ कोटी अपेक्षित आहे. सन २००२-०३ या आर्थिक वर्षामध्ये कर विभागाच्या सगणकीय कामाचा ठेका मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांना रु. ४/४५ प्रती खातेदार इतक्या दराने मंजुर झालेला आहे. २००३-०४ या वर्षाचे कर विभागाचे काम सत्वर होण्याकरिता व नागरिकांना मागणी बीले व नोटीसा त्वरीत बजावणे कामी मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांना बीले / नोटीसा / मागणी व आकारणी रजिस्टर बनविणे या कामा पुरतीच यापुर्वी मंजुर केलेल्या दराने रु. ४/४५ प्र. खातेदार मुदत वाढ देण्यांस स्थायी समितीची मंजुरी असे. सदरचे काम ठेकेदारांनी त्वरीत व वेळेत करावे असे स्थायी समितीने सुचित केलेले आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हंसनाळे.** **अनुमोदन :- श्री. शिवप्रकाश भुदेका.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(मा. सभातींच्या मंजुरीने प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ८९ चे वाचन केले)

**प्रकरण क्र. ८९ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ चा नियम २०(४) अन्वये निम्मे (आठ) स्थायी समिती सदस्य निवृत्त करणेबाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ चा नियम २०(४) अन्वये मा. स्थायी समितीचे १६ सदस्यांपैकी आठ (८) सदस्य दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी दुपारी निवृत्त होतील. त्यांची नांवे खालीलप्रमाणे :-

१) महेंद्रसिंग चौहाण
२) लिओ कोलासो
३) ज्योत्स्ना हंसनाळे
४) तुळशीदास म्हात्रे
५) शशिकांत शहा
६) जेम्स कोलासो
७) शिवप्रकाश भुदेका
८) अशोक पाटील

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :-  दु. ०१.२० वाजता.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**